PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 4, ISSUE 4

# राजेंद्र बनहट्टींच्या लघुकथा : एक आकलन

**डॉ. देवयानी व्ही. चव्हाण**
**असोसिएट प्रोफेसर**
**जी. एस. कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्स**
**नागपूर (महाराष्ट्र) भारत**

## सारांश

गेल्या सहा दशकांत ज्या कथाकारांनी मराठी कथावाङ्मयात मोलाची भर घातली अशा गुणवान कथाकारांत राजेन्द्र बनहट्टींचा महत्त्वाचा सहभाग आहे. आपल्या सकस व सुजाण लेखनकलेने त्यांनी मराठी लघुकथा समुद्ध केली. 1956 साली त्यांनी पहिली कथा लिहिली असली तरी त्यांच्या संस्मरणीय कथालेखनाला खरी सुरुवात 1963 पासून झाली, तेव्हापासून आजतागायत बनहट्टींचे कथालेखन सातत्याने चालू आहे. 1997 च्या अखेरपर्यंत जवळ जवळ शंभर कथांचे लेखन त्यांनी केले आहे. साठोत्तरी मराठी कथेत त्यांनी आपले पृथगात्म स्थान निर्माण केले आहे. बनहट्टी यांचा मनोपिंड चिंतनशीलतेचा आहे. त्यांची लेखणी विविध घटना, प्रसंग, निसर्ग, माणसं, त्यांची नाती यांचा वेध घेते. त्या सा–या नात्यांची तपासणी करते आणि शेवटी आत्मशोधाकडे वळते. खरोखरच व्यक्ती जीवन जगताना का अपेक्षिते? ते पूर्ण होते काय? याविषयीचे लेखकाचे चिंतन सर्वच कथाकादंबरीतून विखुरलेले आढळते. चिंतन आत्मप्रत्ययवादी आणि आत्मसाक्षात्कारी स्वरूपाचे आहे. अनुभवाचे मांडणे त्यांच्या मूळ स्वरूपातच व्यक्त होते. प्रामाणिकपणे अनुभवांना सामोरे जाणे आणि ज्ञान मिळविणे असे या चिंतनाचे स्वरूप आहे. वास्तव जीवन नेमके काय आहे हे या लेखनात शोधले जाते. प्रसंगी तथाकथीत संकेतांना मोडून टाकण्याचे सामर्थ्यही मिळविले जाते. कारण वाङ्मय जीवनाचे प्रतिबिंब त्यात असते. जीवनविषयक अनेक विचार, भावना, लेखनाच्या माध्यमातून लेखक व्यक्त करीत असतो. केवळ जीवन जसे आहे; जसे दिसते तेवढेच तो आपल्या लेखनातून व्यक्त करीत नाही, तर जीवनाकडून त्यांच्या असलेल्या अपेक्षाही तो व्यक्त करतो. बनहट्टी यांचे चिंतन अनेकपदरी आहे. मानवी नात्यातील अनेक पदर, स्त्रीपुरूषसंबंध, मानवी जीवनातील अपरिहार्यता अशा अनेक गोष्टींचा येथे विचार करण्यात येतो. या संपूर्ण चिंतनशीलतेला ऐहिक जीवनाचा आधार आहे. हे चिंतन कधीच पारलौकिक, पारमार्थिक आणि आध्यात्मिक पातळीवर जात नाही आणि ते स्वत:शी प्रामाणिक राहून व्यक्त केल्या जाते. बनहट्टींच्या कथेतील सर्वच पात्रे एखादा अपवाद सोडल्यास बुद्धीमान आहेत. जीवनातील विविध प्रश्नांकडे बघण्याची सर्वसामान्यांची दृष्टी आणि त्यांची दृष्टी वेगळी

आहे, त्यामुळे बनहट्टींच्या कथा आशय व अभिव्यक्ती या दोन्हीतही इतर कथालेखकांपेक्षा वेगळया ठरतात. त्यांच्या पात्रांची अनुभवाला भिडण्याची पद्धत सर्वस्वी भिन्न आहे. ती अधिक चिंतनशील आहे. कथांना दिलेली शीर्षके बहूधा प्रतिकात्मक, आशयाशी संवादी आणि नाट्यपूर्ण तसेच आशयाविषयी कुतुहल निर्माण करणारी असतात. बनहट्टींच्या अधिकतर कथांना मध्यमवर्गीय कौटुंबिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. तथापी या कथांमधून बनहट्टी वातावरण निर्मितीसाठी हमखास नाट्यमयता निर्माण करणाऱ्या कृत्रिम टोकाच्या, हळव्या प्रसंगांचे उपयोजन करीत नाहीत, हे त्यांचे वेगळेपण आहे. सूक्ष्म तपशिलांच्या माध्यमातून चैतन्यपूर्ण वातावरणनिर्मिती करण्यात बनहट्टींचा हातखंडा आहे. बनहट्टींच्या कथेसाठी निवडलेली बीजे मूलतः नाट्यात्म असतात. कथांमध्ये सरळ निवेदनातील भाषेचा पोत यांमध्ये भिन्नता आहे. तथापी बनहट्टी या दोन घटकांची जुळणी अशा कौशल्याने करतात की एकूण कथेमध्ये अपेक्षित असणारा भाषेचा पोत हा एकसंध आणि प्रभावी असाच राहतो. बनहट्टींच्या कथेची शैली अतिशय संपन्न व श्रीमंत स्वरूपाची आहे. त्यांची भाषाशैली त्यांच्या प्रतिमासृष्टीच्या अलंकाराने नटलेली आहे.

**सांकेतिक शब्द** : बनहट्टींच्या लघुकथा, मानवीमन, नाटयात्मकता, पृथगात्मता, चिंतनशीलता

## विवेचन :

### 1963 ते 1998 या कालखंडातील लघुकथालेखनातील महत्वाचे टप्पे

1963 पासून 1969 पर्यंत साधारण सहा वर्षाच्या कालखंडात बनहट्टींनी एकूण 21 कथा लिहिल्या. त्या वाङ्मयशोभा, नवेजग, हंस, विनोद, मोहिनी, किर्लोस्कर, प्रपंच, मनोहर, प्रसाद, सत्यकथा या नियतकालिकांतून प्रकाशित झाल्या असल्या तरी जास्तीत जास्त कथा हंसमधून प्रकाशित झालेल्या आहेत. त्यांची 'पिता' ही पहिली कथा 1956 साली तरुण भारतमध्ये प्रकाशित झाली. त्यानंतर सात वर्षाच्या प्रदीर्घ काळानंतर त्यांची 'पंख आणि शिंगे' ही लघुकथा ऑगस्ट 1963 मध्ये वाङ्‌मयशोभा मासिकात प्रकाशित झाली. सुरूवातीला अगदी लहान असलेल्या भावंडांचं प्रेम कसं बालीश, निरपराध, निरागस असतं याचं सुंदर वर्णन त्यांनी कथेच्या सुरुवातीला केलेलं आहे. पण जसजसं वय वाढत जातं तसतसं मन हे सैरावैरा पळायला लागत. मनाचे पापुद्रे उलगडायला लागतात. त्यातला बालीशपणा जाऊन काहीसा अपरिपक्वपणा आलेला असतो. कुमारावस्थेत मनावर धुंदी चढलेली असते. तारुण्याच्या उंबरठ्यावर उभे असतात पण तो उंबरठा कसा ओलांडावा हेच त्यांना कळत नाही. काही चुका ह्या नकळत होऊन जातात. अशाच प्रकारची चूक झालेल्या बहिणीचे वर्णन या कथेत आलेले आहे. आई–मुलगी, बहीण–भाऊ, वडील–मुलगी, वडील–मुलगा या नात्यांचा सूक्ष्मवेध बनहट्टी घेतांना दिसतात. त्या नात्यातील ताणतणाव, अपत्यांना आपल्या आईवडिलांची ओळख नव्याने पटल्यानंतर त्यांच्यात होणारा बदल, त्यांच्या मनाची स्पंदने या कथेतून सामर्थ्याने व्यक्त करतात. माणसा–माणसांतील विविध नातेसंबंधाचा शारीरिक, मानसिक स्थित्यंतराचा वेध घेणारी ही कथा जीवनाच्या गाभ्यालाच स्पर्श करणारी आहे. 1963 मध्ये नवे जग मासिकात 'रडणारी बाहुली' ही लघुकथा प्रकाशित झाली. या कथेत अण्णा चिरमुले नावाच्या हायस्कूल शाळेत शिकविणा–या पगार जेमतेम असल्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कसे अवघड जाते. गरिबी माणसाला कशी लाचार बनविते याचे चित्रण त्यांनी केले आहे.

1964 मध्ये 'दोस्त' ही एकच लघुकथा त्यांनी लिहिली. 1965 मध्ये 'भित', 'गणिताचे मास्तर', 'शंभूराव वाटाघाट करतात' या कथा हंस या मासिकात मे, सप्टेंबर आणि दिवाळी अंकात प्रकाशित झाल्या. 1966 ला 'शंभूराव घबाडाच्या शोधात', 'शंभूरावांची शोकांतिका' 'शंभूरावाचे स्त्री दाक्षिण्याचे प्रयोग' या लागोपाठ तीन विनोदी कथा आणि 'वारसा' या कथेत बनहट्टींनी वारस असूनही बेवारस झालेल्या सोनटक्के मास्तरांची अवस्था चित्रित केली आहे. कुढल्याही प्रकारचे कौटुंबिक वातावरण त्या घरात नाही. एकमेकांबद्दल प्रेम, जिव्हाळा, आपुलकी त्या नात्यात नाही. फक्त आहे तो स्वार्थ, समाजातील वास्तव त्यांनी हया कथेत मांडलेले आहे. 1967 साली 'गालबोट' आणि 'बहा–तरावा रोग' या दोन कथा लिहिल्या. 'गालबोट' ही कथा या मुलीची बिजवर मुलाशी झालेंल्या विवाहाची कथा आहे. तर 'बहा–तरावा रोग' या कथेत डॉक्टर आणि पेशंट यांच्या प्रेमविषयक संबंधांची कथा आहे.

1968 हे वर्ष त्यांच्या कथालेखनातील महत्त्वाचे वर्ष मानावे लागेल कारण 1968 मध्ये त्यांनी सहा कथा लिहिल्या आणि त्या सर्व कथा दर्जेदार होत्या. 'एका चोराची अखेर', 'समानधर्मा', 'रहस्य', 'सुरुवात', 'इंटरव्ह्यू', 'बढती' या सर्व कथा 'समानधर्मा' या कथासंग्रहात समाविष्ट करण्यात आल्या आणि त्यांचा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. 'समानधर्मा' या पहिल्या कथासंग्रहाबद्दल आनंद अंतरकर म्हणतात, ''समानधर्मा या त्यांच्या पहिल्याच कथासंग्रहात त्यांच्या लेखनाची सारी वैशिष्ट्ये दिसतात आणि पुढच्या कसदार नि परिपक्व लेखनाची ग्वाही मिळते. त्या संग्रहातील 'सुरुवात' या कथेला किर्लोस्कर कथास्पर्धेचे पहिले पारितोषिक मिळाले. त्यानंतर सतत पारितोषिक मिळत गेली. 'सुरुवात' ही कथा नुकतेच लग्न झालेल्या तरुण जोडप्याच्या भावी जीवनातील सा–या घटितांची झलक दाखविणारी आहे. 'सरुवात' या कथेबद्दल श्रीराम शिधये म्हणतात,''कथा संपली तरी वाचकाच्या मनात ती चालूच राहण्याचा हा प्रकार बनहट्टी यांच्या कथांमध्ये अनेकदा दिसतो.

1969 मध्ये त्यांनी 'क्रांती', 'मी कोण आहे?' या दोन कथा लिहिल्या आणि त्यांच्या 'मी कोण आहे?' या कथेला किर्लोकर कथास्पर्धेचे दुसरे पारितोषिक मिळाले. यावरून असे दिसते की त्यांच्या कथालेखनातील सुरुवातीच्या कथाप्रवासातील कथासुद्धा वाचकांच्या पसंतीला उतरलेल्या होत्या आणि त्याला एक चांगला दर्जा असून त्या सकस होत्या. बनहट्टींच्या लघुकथेच्या संदर्भात विलास खोले म्हणतात,''त्यांच्या चांगल्या लघुकथासुद्धा व्यक्तीला व तिच्या कृतीला प्राध्यान्य देणा–या आहेत. तेथेही माणसाच्या मनोव्यापारांवर त्यांचे लक्ष केंद्रित झाले आहे. त्यात्या माणसाच्या व्यक्तित्वाची कळ त्यांना सापडते आणि ती ते अचूकपणे मांडतात.'' या कालखंडात लिहिलेल्या कथा या साधारणपणे मध्यमवर्गीय कौटुंबिक कथा आहेत आणि माणसाच्या मनाचा वेध घेणा–या कथा आहेत. सूक्ष्म निरिक्षणातून त्यांच्या कथा साकार होतात. शहरी आणि ग्रामीण असे दोन्ही प्रकारचे जीवन बनहट्टी आपल्या कथेत साकार करतात. त्या सर्व कथांचे प्राथमिक वैशिष्ट्य म्हणजे त्या सर्व कथा व्यक्तिप्रधान आहे.

**1971 ते 1981 लघुकथालेखनातील दुसरा मह–त्वाचा टप्पा**

1971 ते 1981 या दहा वर्षात बनहट्टींनी एकूण तीस कथा लिहिल्या. जास्तीत जास्त कथा 'हस' या नियतकालिकातून प्रसिद्ध झाल्या. 1981 साली प्रकाशित झालेली 'गंगार्पण' ही दीर्घकथा सोडली तर बाकीच्या एकोणतीस लघुकथाच

लिहिल्या. नागपूर आणि पुण्यातील मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवनाचा अनुभव हा बनहट्टींच्या लघुकथेतील अनुभवविश्वाचा प्रमुख घटक आहे. हे अनुभवविश्व त्यांच्याच भोवतालचे आहे. प्रामुख्याने सभोवतालच्या जीवनानुभवातच बनहट्टींना कथाबीज गवसते. लौकिक अनुभूतीवरच ते कथारचना करतात; परंतु याचा अर्थ बनहट्टी ते अनुभव 'जसेच्या तसे' वाचकासमोर मांडतात असा नाही. लेखकाला जेव्हा जीवनातील एखाद्या उत्कट क्षणाचे, एखाद्या अनुभवाचे, एखाद्या भावस्थितीचे दर्शन रसिकांना घडवायचे असते. त्यातील सौंदर्य त्यांच्या निदर्शनाला आणावयाचे असते, तेव्हा कथेची निर्मिती होते. मध्यम वर्गाचे अनुभवविश्व, त्यांच्या भावभावना, त्या भावनांची गुंतागुंत त्यांच्या कथांचा केंद्रबिंदू आहे. त्यांच्या सर्व लघुकथा सर्वसामान्य सुशिक्षित, सुसंस्कृत माणसांच्या जीवनजाणिवेशी संलग्न आहेत. त्यांनी या दहा वर्षाच्या काळात पाच विनोदी कथाही लिहिलेल्या आहेत.

1971 साली 'चिमटा' आणि 1972 साली 'विकतचे अध्यक्षपद' या कथा लिहिल्या.1973 ला 'पाठलाग' ही कथा काशिनाथ बेलसरे या प्रामाणिक, विश्वासू कारकुनाची कथा आहे. प्रामाणिक असल्यामुळे मालक त्याला पैसे घेऊन मुंबईला बोलावतात. पण बेलसरेला वाटते की आपला कोणीतरी पाठलाग करतो आहे. त्यामुळे ते खूप भयभित होतात. पण शेवटी मालकाने सोपविलेले काम व्यवस्थित करतात. 'खेळ' या कथेत पौंगडावस्थेतील मुलाच्या मनात नकळत फुलणारे मुलीविषयीचे यौवनसुलभ हळुवार आकर्षण विकसित झालेले आहे. 'खेळ' या कथेबद्दल श्रीराम शिधये म्हणतात,"कथा वाचून संपली की नायकाच्या मनातील हा खेळ वाचकाच्या मनात सरू होतो.या कथेमध्ये राजेन्द्र बनहट्टी यांनी पोरवयातील कोवळया भावनांचं जे सूक्ष्म,मर्मग्राही आणि अतिशय नाजुक असं चित्रण नेमकेपणाने केलं आहे, ते अविस्मरणीय असंच आहे." 1974 मध्ये त्यांनी एकूण तीन कथा लिहिल्या. 'पुन्हा एकदा', 'सूर्यास्त', 'सदाचाराचा गुरुमंत्र' 1975 मध्ये 'आंब्याची सावली' आणि 1976 मध्ये 'साप' ह्या विनोदी कथा लिहिल्या. 1977 मध्ये त्यांनी 'वैरीण झाली रात्र', 'माझा पहिला अपघात', 'युगान्त', 'गंडान्तर', 'दंगल', 'शुक्रवारची कहाणी' या सहा लघुकथा लिहिल्या. 'युगांत'या कथेत पं. नेहरू गेल्यामुळे युगाचा अंत झाला आणि पोकळी निर्माण झाली. तशीच पोकळी दादांच्या जीवनात पत्नीच्या मृत्यूमुळे निर्माण झाली त्याचे वर्णन आले आहे.

1978 ला त्यांनी 'दुपार', 'सांगाती', आणि 'जगावेगळे कॉलेज' या लघुकथा लिहिल्या. 1979 ला 'रिकामा' आणि 'पोरका' या दोन लघुकथा लिहिल्या.'रिकामा' या कथेत व्यसनाधीन राजाभाऊंची व त्याच्या व्यसनाधीन मित्रांची कथा आहे. तर 'पोरका'या कथेत मंगसुळी या व्यक्तीची जीवनाशी चाललेली धडपड आणि शेवटी त्याचा अचानक झालेला मृत्यू याचे वर्णन आहे.

1980 ला त्यांनी 'राम काळेची आई' ही एकच लघुकथा लिहिली. 1981 ला आपल्या कथालेखनाच्या प्रवासातील सर्वात जास्त सात कथा लिहिलेल्या आहेत. बनहट्टींनी अनेकविध अनुभवांकडे विविध कोनांतून पाहून माणूस शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. लेखक म्हणून एक निश्चित अशी भूमिका वा दृष्टिकोन न स्वीकारता अनेकविध पद्धतींनी विविध पातळयांवर अनुभव घेणे, ही बनहट्टींनी कलावंत म्हणून केलेली निवड आहे. या भूमिकेमुळेच त्यांच्या कथांमधील अनुभव कधी एकपदरी सरळसोट नसतो. पु. भा. भाव्यांप्रमाणे कथेमधून एकच जीवनानुभव किंवा एकच भावना फुलवीत न नेता तिच्या विविध

रूपांचे सूक्ष्म, तरल, व्यामिश्र असे दर्शन ते घडवितात. श्रीराम शिधये म्हणतात,''एकाच अनुभवाचे सूक्ष्म स्तर पुनः पुन्हा तपासून पाहावेत आणि मानवी स्वभावाचं वेगळंच दर्शन घ्यावं, निराळाच पैलू निरखावा, असा ध्यास बनहट्टींना आहे.''

**1982 ते 1998 तिसरा लघुकथालेखनातील महत्त्वाचा कालखंड**

1981 पासून बनहट्टींनी दीर्घकथा लिहायला सुरुवात केलेली असली तरी आपल्या लेखनप्रवासात लघुकथाच जास्त लिहिलेल्या आहेत. 1982 मध्ये बनहट्टींनी 'धंदा','खेळण',या लघुकथा लिहिल्या. 'धंदा' या कथेत लक्ष्मणला रेल्वे प्लॅटफार्मवर पेरू विकण्याचा धंदा करताना कशाप्रकारचा त्रास होतो त्याचे हदयस्पर्शी चित्रण करतात. गुंड प्रवृत्तीची माणसे लक्ष्मणच्या टोपलीतील सर्व पेरू त्याच्या समोर खाऊन पुन्हा लक्ष्मणलाच शिव्या देतात. पेरू कापायचा चाकू, पेरू, मसाला, सर्व गायब करतात आणि लक्ष्मणला एकही पैसा न देता मारून पसार होतात. 1983 ला 'आत्मा अमर आहे', 'वनवास','हरवलेली माणसे'या तीन लघुकथा लिहिल्या. 'आत्मा अमर आहे' या कथेत भालूकाका हे पात्र. ऐकटेच राहणारे, कोणीही जवळचे नातेवाईक नसणारे आणि म्हातारे. पुजा–याचे काम करणारे, प्रवचने, कीर्तने करीत देवधर्मात काळ कंठणारे. 'हरवलेली माणसे' या कथेत पांडे या व्यक्तीचे रंग बनहट्टी अलगदपणे उलगडतात. पांडेला नाटक, सिनेमाचा शौक होता. नाटक, सिनेमा पाहण्यासाठी भिकसुद्धा मागेन असा तो म्हणायचा. एकशे सहा वेळा सौभद्र फुकट पाहणारा पांडे मात्र सिनेमासाठी पैसे खर्चत होता. इंग्रजी सिनेमाचे त्याला फार कौतुक होते पण पांडेचं आयुष्य मात्र हरवलेले होते. बायको, मुलगा, दुकानातला देसाई, हीच माणसं नव्हते तर खुद्द निवेदकही पांडेच्या मागे धावताहेत पण पांडे त्यांना गवसत नाही. जे काही करायचं होतं, ते त्यानं बिनबोभाटपणे केलं. जसं त्याला जगायचं होतं तसा तो जगला. पांडेच्या आयुष्यात काही रहस्य होतं का? असे अनेक प्रश्न बनहट्टी अनु–तरित ठेवतात. पांडेला ते उघडा करीत नाहीत. अशाप्रकारे या कथेत मानसिक आणि भावनिक स्थित्यंतरे बनहट्टी दाखवितात. विलास खोले म्हणतात,''बनहट्टींच्या कथाविश्वातील माणसे कोणत्याही चारचौघा सामान्य माणसांसारख्सी आहेत. ती सारी मध्यमवर्गीय पाढरपेशा समाजातील आहेत.'' बनहट्टी यांना दुःख दिसले, सुखही दिसले, चांगलेवाईट या सर्वांचा सर्वार्थाने अभ्यास केला. श्रीराम शिधये म्हणतात,''राजेन्द्र बनहट्टींनी आपल्या कसदार लेखणीतून उतरणा–या, वाचकाला भारावून टाकणा–या त्याला अंतर्मुख व्हायला लावणा–या, जीवनाचं आरस्पानी दर्शन घडविणा–या कथा सातत्यानं लिहिल्या आणि मराठीचा कथाप्रवाह पुन्हा जोमदारपणे खळाळत ठेवला.''

## निष्कर्ष–

1 बनहट्टींच्या लघुकथा जीवनाचे विविधांगी दर्शन घडवितात.

2 बनहट्टींच्या लघुकथा व्यक्तिप्रधान आहेत. मध्यमवर्गीय, पांढरपेशेजीवन त्यांनी कथेतून साकार केले आहे.

3 बनहट्टींची शैली चित्रात्मक, एकप्रकारची संथ वाटणारी पण गतिमान असलेली शैली आहे.

4 बनहट्टींच्या लघुकथेत भाषेचा जिवंतपणा, रसरशीतपणा आणि भाषेची चित्रमयता अगदी मोजकेच अलंकार लेवून विलक्षण लालित्याने सामो–या येतात.

5 बनहट्टींच्या लघुकथा मानवी मनाच्या तळ शोधणा–या, सूक्ष्मातिसूक्ष्मू मनोव्यापारांचा वेध घेणा–या आहेत.

6 बनहट्टींच्या लघुकथेतील माणसे अनेकदा देहाने एकत्र येतात पण मनाने ती एकमेकांपासून दूर राहतात.

7 बनहट्टींच्या लघुकथेतील नाट्य मोठया ताकदीने आणि सूक्ष्ममनोविश्लेषणात्मक पद्धतीने वाचकांसमोर उभे राहतात.

8 बनहट्टींच्या लघुकथा या मनोवर्तनावर भर देणा–या असून नियती व निसर्ग हे घटक त्यात नाही.

9 बनहट्टींच्या लघुकथेतील पात्र आत्मसंघर्ष करताना दिसतात.

10 बनहट्टींच्या लघुकथा संथपणे परिणाम साधत जाणा–या पण निवेदनात गतिमानता निर्माण करणा–या आहेत.

11 बनहट्टींच्या लघुकथेची रचना पारंपरिक असली तरी तिची बांधणी आणि विकास कौशल्याने केलेला आहे.

12 बनहट्टींच्या लघुकथेत संवादालाच महत्वाचे स्थान आहे.

## संदर्भ

1 श्रीराम शिधये : प्रस्तावना, राजेन्द्र बनहट्टी यांच्या निवडक लघुकथा, मुंबई, 1998

2 विलास खोले : राजेन्द्र बनहट्टी आणि त्यांचे कथात्म साहित्य, ललित, अमृतमहोत्सवी साहित्य संमेलन विशेषांक, जानेवारी, 2002

3 विलास खोले : प्रस्तावना, राजेन्द्र बनहट्टी यांच्या निवडक दीर्घकथा, पुणे.

4 मो. मा. खरात : वाचकाला खिळवून टाकणारा बनहट्टींचा कथासंग्रह खेळ, तरुण भारत, पुणे 1976.

5 राजेन्द्र बनहट्टी : दस–या पिढीचे आत्मकथन, मुंबई, 2008,

6 आनंद अंतरकर : बनहट्टींची गोष्ट, ललित, जानेवारी, 2002,

7 आनंद अंतरकर : मनोधाग्यांचा मनोज्ञ गोफ, महाराष्ट्र टाईम्स,पुणे